**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा ‘अ’ मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## ‘विद्या विषयक लेखा परीक्षा’ पूल ऑफ एक्सपर्टस् यादी दुरूस्तीबाबत सूचना

अमरावती-

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम २०१६ प्रमाणे महाविद्यालयांचे संलग्निकरण वाढीकरीता ‘विद्या विषयक लेखा परीक्षेची’ तरतूद आहे. विद्यापीठाने ‘विद्या विषयक लेखा परीक्षेची’ मानके व कार्यप्रणाली निदेश क्र. १६/२०२०, दि. १२/१०/२०२० नुसार निर्गमित केली आहे.

ज्या महाविद्यालयांचे विषय, अभ्यासक्रम, विद्याशाखेचे संलग्निकरण २०२०-२१ पर्यंत आहे, अशा महाविद्यालयांनी सत्र २०२१-२२ पासून विद्या विषयक लेखा परीक्षणाच्या माध्यमातून महाविद्यालयांचे संलग्निकरण करावयाचे आहे. सदर लेखा परीक्षा पूल ऑफ एक्सपर्टस् च्या माध्यमातून करण्यात येणार असून त्या यादीला अधिष्ठाता मंडळाच्या सभेमध्ये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर मंडळामध्ये ठरल्यानुसार पूल ऑफ एक्सपर्टस्ची अंतीम यादी दुरुस्तीसाठी विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर ‘न्युज ॲन्ड अनाऊन्समेन्ट’ मध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे.

तरी सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, प्रसिद्ध करण्यात आलेल्या पूल ऑफ एक्सपर्टस् च्या यादीमधील सदस्यांना त्यांच्या विषयीच्या माहितीमध्ये काही दुरुस्ती सूचवावयाची असेल, त्यांनी प्राचार्यांच्या माध्यमातून दि. २० जानेवारी, २०२१ पर्यंत drcollegiate@sgbau.ac.in या ईमेलवर विद्यापीठाला पाठवावयाची आहे. त्यानंतर दुरुस्ती स्वीकारल्या जाणार नाही, तसेच उपरोक्त निदेशानुसार तयार करण्यात आलेल्या पूल ऑफ एक्सपर्टस् च्या अंतीम यादीत नव्याने नाव समाविष्ट करता येणार नाही, याबाबत विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना विद्यापीठाने पत्र पाठवून कळविले आहे. तरी सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी, असे विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी कळविले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. १३/०१/२०२१.
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,
आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी